ISSN 2278-8808 SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# धर्म व्यवस्था व शिक्षण व्यवस्था यातील लोकसहभागाचा एक अभ्यास

**सुभाष अमर सावंत, Ph. D.**

*लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मंडणगड, मु. पो. ता. मंडणगड, जिल्हा रत्नागिरी 415203*

Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com

**प्रस्तावना –**

कोणतीही विकास प्रक्रिया ही मानव केंद्रीत असलेली दिसून येते. मानवाला ज्या ज्या गोष्टी पासून अधिक समाधान मिळत गेले त्या त्या बाबींच्या विकासाला त्याने अधिक महत्व दिले. मानवाला आपले जीवन अधिक सुखकर जगता यावे यासाठी मानवाने कुटुंब संस्था, विवाह संस्था, जाती संस्था, शिक्षण संस्था, धर्म संस्था इत्यादी विविध संस्था किंवा व्यवस्था निर्माण केल्या. त्या संस्थांच्या सहाय्याने तो जीवन जगत असतांना त्याने जगण्याचे नियमही ठरविले व हया संस्थांचे त्याने बंधनही स्वीकारले. या सर्व संस्थांचा आधार घेऊनच मानवाने आपली प्रगती केली. या प्रत्येक संस्थांचे कार्य प्रत्यक्षपणे एकमकांवर अवलंबून आहे. प्रत्येक संस्थेची एक विकासाची किंवा हस्तक्षेपाची एक मर्यादा ठरलेली असून या मर्यादेच्या बाहेर जाऊन एखादया संस्थेचा मानवी जीवनावर हस्तक्षेप वाढतो त्यावेळी खऱ्या अथाने मानवाचे जीवन दोलायमान होतांना दिसून येते किंबहुना ही परिस्थिती मानवाच्या विकासाच्या आड येतांना दिसून येते. अगदी प्राचीन काळात मानवी जीवनावर निसर्गाचा प्रभाव मोठया प्रमाणात होता. निसर्गामध्ये घडणाऱ्या अनेक घटना हया मानवी जीवनाला एक अविष्कार वाटू लागला. त्यातून मानवाने या निसर्गाचा एक शक्ती म्हणजेच देवाच्या स्वरूपात त्याचा स्विकार केलेला दिसून येतो. यातूनच देव धर्माच्या संकल्पना उदयास आल्या. पूर्वी टोळयाने राहणाऱ्या मानवाने आपआपल्या कल्पनेनुसार देवाला खुश ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. यातूनच या समाजात खोलकर रूजलेली अंधश्रध्दा, भाबडया धर्म कल्पना, अवैज्ञानिक समज याचा प्रभाव मोठया प्रमाणात निर्माण झाला. पुढे जस जसे मानवी जीवन स्थिर होऊ लागले तसतसे शिक्षणाचा प्रभाव काही प्रमाणात समाजावर होण्यास सुरूवात झाली. यातूनच या समाजाला अवैज्ञानिक परिस्थितीतून बाहेर पडण्यास मदत मिळू लागली.

जगाचा इतिहास विचारात घेता आपणास लक्षात येईल की ज्या ज्या देशामध्ये धर्मांधपणा वाढला त्या त्या देशाच्या प्रगतीवर व विकासावर त्याचा परिणाम झालेला दिसून येतो. आपल्या देशातील सद्यस्थिती लक्षात घेता पुन्हा एकदा आपण याच धर्मव्यवस्थेमध्ये गुरफटले जात आहोत का याचा ही आपण विचार करणे गरजेचे आहे. जेव्हा कोणत्याही देशात शिक्षणापेक्षा धर्मव्यवस्था ही प्रबल होते तेव्हा

त्या देशामध्ये अंधश्रध्दा, बुवाबाजी कामचोरपणा अशा अनेक गोष्टी बोकाळतात व त्यातूनच त्या देशाचा व अर्थाने त्या देशातील जनता अंधकारात डुबते. कर्मापेक्षा लोकांचा धर्मावर अधिक विश्वास प्रबल होतो. परंतु या अभ्यासाचा उद्देश व्यवस्थेला समाजामधून तसेच शासन व्यवस्थेकडून अधिक पाठबल मिळाल्यास ही व्यवस्था अधिक बोकाळते. जागतिक पातळीवर भारत हा देश अव्वळ नंबरकडे वाटचाल करत असतांना या देशात खऱ्या अर्थाने शिक्षणाचे रोजगाराचे वारे जोरदार वाहने गरजेचे आहे. परंतु आपल्या देशात शिक्षणापेक्षा जेव्हा धर्मव्यवस्थेला जर स्थान दिले गेले तर खरोखरच आपण हे यश प्राप्त करू शकू का ? जेव्हा शासन व्यवस्थाच धर्म व्यवस्थेला अधिक बळकट करण्याचा प्रयत्न करते तेव्हा श्रमाला व शिक्षणाला अधिक कमी लेखले जाते. यातून देशाचा विकास न होता तो देश अधोगतीला जातो. या परिस्थितीचा अभ्यास यातूनच होणे गरजेचे आहे.

**गृहीतबाबी :**

भारतामध्ये आज शिक्षण व्यवस्थेपेक्षा धर्मव्यवस्थेचा प्रभाव वाढतांना दिसून येत आहे.

**अभ्यासावरील मर्यादा :**

धर्मव्यवस्था व शिक्षण व्यवस्था यातील लोकसहभागाचा एक अभ्यास या अभ्यासाच्या मर्यादा लक्षात घेता हा अभ्यास मंडणगड तालुका मर्यादीत करण्यात आलेला आहे. यासाठी मंडणगड तालुक्यातील 10 गावांची निवड करण्यात आलेली असून धर्मव्यवस्थेतील लोकांचा सहभाग अभ्यासण्यासाठी विविध धर्मांची प्रार्थनास्थळे व त्या स्थळांतील लोकांचा सहभाग या विषयी अभ्यास केलेला आहे. तर शिक्षण व्यवस्थेचा विचार करता त्या गावामधील शाळा, हायस्कूल, महाविद्यालये इ. च्या माध्यमातून लोकांचा सहभाग कसा आहे याचा अभ्यास करून संशोधकाने हा शोधनिबंध पूर्ण केलेला आहे.

**शिक्षण व्यवस्था व धर्मव्यवस्था यांचा संबंध**

**शिक्षण व्यवस्था –**

शिक्षणाचा संबंध केवळ ज्ञान साधनेशी नसून तो व्यक्तिच्या प्रत्यक्ष वर्तनाशी म्हणजे सुसंस्कार, सभ्यता, शिस्तबध्दता, संमती जीवन, संवेदनशीलता, सर्वधर्म सहिष्णुता, राष्ट्रभक्ती, श्रम प्रतिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन इ. मुल्यांशी जोडला गेलेला दिसून येतो. शिक्षण हे व्यक्तिमधील अंतःस्थ शक्तीचा विकास घडविण्यास सहाय्य करते. त्यामुळे शरीर, बुध्दी, भावना व जीवन मुल्य याचा अधिक चांगल्या प्रकारे विकास होतो. लोकांच्या गरजा व आकांक्षा यांच्याशी शैक्षणिक कार्यक्रमाचा योग्य पध्दतीने समन्वय घातल्यास यातून राष्ट्रीय विकास अधिक झपाटयाने घडून येतो.

राष्ट्राची प्रगती देशातील नागरीकांच्या सुजाणतेवर अवलंबून असते. शिक्षणाच्या अभावाने राष्ट्राच्या प्रगतीत अडथळे निर्माण होतात. आपल्या समाजात खोलवर रूजलेल्या अंधश्रध्दा, धर्मकल्पना व अवैज्ञानिक समज हे राष्ट्रीय विकासाच्या विरोधी शक्ती आहेत. त्यामुळेच राष्ट्रीय विकास साधण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला कमीत कमी पायाभूत शिक्षण मिळणे जरूरीचे आहे. ग्रामीण भागातील लोकांना शिक्षणाचर आवश्यकता मोठया प्रमाणात आहे. कारण प्रचंड वेगाने बदलत चाललेल्या समाज व्यवस्थेने तो गोंधळून गेलेला असून या परिवर्तनाला जमवून घेणे ही काळाची गरज असून यासाठी शिक्षणाची मोठया

प्रमाणात गरज आहे हे परिहार्य वाटू लागले. यातूनच धर्म हया संकल्पनेमध्ये देवी देवतांचे वर्चस्व निर्माण झाले असे म्हणता येईल.

देव या संकल्पवनतून दैव ही संकल्पना पुढे आली. देवावरील अंधविश्वासामुळे आपल्या नशीबात असेल तर कोणतीही गोष्ट विनासायास घडले असा विश्वास समाजामध्ये निर्माण झालेला दिसून येतो. समाजामध्ये आपल्या श्रमापेक्षा, मेहनतीपेक्षा नशीबावर अधिक विश्वास ठेवणाऱ्यांची संख्या वाढू लागलेली दिस्न येते. यातूनच बुवाबाजीचे पेच फुटून आज सर्वच स्थरातील हे बुवा जनतेला लुटतांना त्यांची फसवणूक करतांना बघावयास मिळत आहेत. समाजामध्ये देवावरील अंध श्रध्देमुळे देवाच्या साधुसंतांच्या भक्तीभावाकडे समाजाचा अधिक ओढा निर्माण झालेला दिसून येतो. आज लाखो करोडो जनता ही आपल्या मनातील इच्छा पूर्ण होण्यासाठी तसेच मनाला शांती लाभण्यासाठी आपला वेळ व पैसा फुकट घालवत आहेत. मुळात यापैकी किती लोकांना भक्तीचा अर्थ समजला ही बाबच दूर आहे.

**धर्मव्यवस्था व शिक्षण व्यवस्था यांचा सहसंबंध**

पूर्वीच्या काळी धर्माचा मोठा प्रभाव समाजावर होता मंदिर व आश्रम हे एक शिक्षणाचे केंद्र होते. राजधर्माचे शिक्षण हे सुध्दा विविध आश्रमात मिळालेली अनेक इतिहास कालीन उदाहरणे सांगता येतील. उच्च जातीतील मुलांना धर्माचे शिक्षण हे देवालयातच मिळे. गाडगेमहाराजांनी जनतेला जे अनौपचारिक शिक्षण किर्तनाच्या माध्यमातून दिले ते देऊन व त्याच्या परिसरामध्येच दिले की जे स्वतः देव मानत नव्हते. कारण त्यांना माहित होते सर्वाधिक समाज एकत्र येण्याचे ठिकाण हे धर्मस्थळे आहेत. अमेरिकेमध्ये सुध्दा चर्चच्या माध्यमातून शिक्षण दिले जात होते. आजही धार्मिक शिक्षण दिले जाते. किंबहुना संपूर्ण समाजावर नियंत्रण व राजकारभार हा सुध्दा चर्चच्या माध्यमातून चालविला जात होता.

परंतु पुढे जसजसे विज्ञान प्रगत झाले तसतसे अनेक संधोधनातून वैज्ञानिक संशोधकांनी तसेच तत्वज्ञानांनी धर्मव्यवस्थेचे स्वरूप धर्म व शिक्षणाचे स्वरूप कार्य याची स्वतंत्र मांडणी संशोधनातूनच केलेली दिसून येते. यातूनच धर्माचे कार्य हे सद्यस्थितीत समाज नियत्रणाचे असावे हे ही पुढे झालेले दिसून येते. तर शिक्षण हे प्रत्येकाने घेणे गरजेचे आहे. तरच त्याला सत्यअसत्य, योग्य अयोग्य, वैज्ञानिक अवैज्ञानिक अशा प्रकारे योग्य पध्दतीने मानव विचार करू शकतो. पूर्वी शिक्षणाचा प्रभाव कमी होता म्हणून धर्मांध व्यवस्थाही बोकाळलेली होती. 'असेल हरि तर देईल खाटल्यावरी' ही परिस्थिती त्यातूनच निर्माण झाली होती.

आजच्या परिस्थितीत मात्र शिक्षणाचे प्रमाण वाढलेले असेल तरी सुध्दा आपल्या देशात धर्माचा उन्मात मोठया प्रमाणात वाढतांना दिसून येत आहे. अनेक सुशिक्षित तरूण धर्मांच्या नावाने दहशत पसरवू इच्छित आहेत. धर्माच्या राज्यांची संकल्पना अनेक धर्म वेडया समाजांच्या माथी मारली जात आहे. आपल्या धर्माला दुसऱ्या धर्मापासून कसा धोका आहे हे तरूणांच्या डोक्यात विषय पेटले जात आहे. हिंदु, मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन इ. धर्मामध्ये जगामध्ये देशामध्ये आपले वर्चस्व असावे असे विचार पेटले जात आहेत. एका बाजूला आपण अपघानिस्तानची परिस्थिती जवळून पाहात आहोत. तालिबान संघटनेने अपघानिस्तानात मुस्लिम सत्ता असावी यासाठी समाजाला प्रवृत्त केले. परंतु प्रत्यक्षात मुस्लिम सत्ता

प्रस्तापित होताच तेथील मुस्लिम स्त्रियांवर बंधने वाढली, बुध्द मुलाचे भजन केले आज या तालिबानींचाच तेथील समाजाला एका अर्थाने त्रास सहन करावा लागतो आहे. जेव्हा एखाद्या धर्माचे राज्य प्रस्थापित होते तेव्हा तेथील समाज हा असुरक्षित असतो. त्या देशामध्ये कर्मावर विश्वास कमी असतो त्या देशात धर्मभोळेपणा वाढतो व तो रसातळाला जातो.

**शिक्षण व्यवस्था व धर्म व्यवस्था यातील लोकसहभागाचा अभ्यास**

**शिक्षण व्यवस्था व धर्मस्थळांची माहिती**

| अ. क. | गावाचे नाव | शिक्षण व्यवस्था | | | | | धर्म व्यवस्था | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जि.प. शाळा | हायस्कूल | ज्यु. कॉलेज | मदरसा | एकूण | मंदीर | मस्जिद | बुध्द विहार | एकूण |
| 01 | दहागाव | 01 | 01 | — | — | 02 | 04 | 01 | 01 | 06 |
| 02 | कुंबळे | 01 | 01 | 01 | — | 03 | 06 | 02 | 01 | 09 |
| 03 | पिंपळगांव | 02 | — | — | — | 02 | 07 | 01 | — | 10 |
| 04 | कादवण | 03 | — | — | — | 03 | 03 | 01 | 01 | 05 |
| 05 | वलौते | 01 | — | — | — | 01 | 05 | 01 | 01 | 07 |
| 06 | भोळवली | 01 | — | — | — | 01 | 05 | 01 | 01 | 07 |
| 07 | म्हाप्रळ | 03 | 02 | — | — | 05 | 12 | 01 | 01 | 14 |
| 08 | शेनाळे | 01 | — | — | — | 01 | 01 | — | — | 01 |
| 09 | सडे | 02 | — | — | — | 02 | 02 | — | 01 | 03 |
| 10 | धुत्रोली | 01 | — | — | 01 | 02 | 04 | 01 | — | 05 |
| | **एकूण** | **16** | **04** | **01** | **01** | **22** | **49** | **09** | **07** | **67** |

वरील प्रमाणे मंडणगड तालुक्यातील विविध दहा गावांचा अभ्यास करता या गावांमध्ये एकूण प्राथ. शिक्षण ते ज्यु. कॉलेज इ. एकूण शिक्षण व्यवस्था 22 इतका दिसून येतात. त्याच गावात मात्र धर्म व्यवस्थेची प्रतिके असलेली मंदीर, मस्जिद, बुध्दविहार यांची संख्या 67 इतकी म्हणजेच तीन पटीने अधिक दिसून येते.

याचाच अर्थ शिक्षण व्यवस्थेपेक्षाही आजही धर्मव्यवस्थेला, समाज अधिक स्थान देतांना दिसून येत आहे.

**शिक्षण व्यवस्था व धर्मस्थळांवर होणा—या खर्चाची माहिती**

| अ. क. | गावाचे नाव | शिक्षण व्यवस्था (लाखात) | | | | | धर्म व्यवस्था (लाखात) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जि.प. शाळा | हायस्कूल | ज्यु. कॉलेज | मदरसा | एकूण | मंदीर | मस्जिद | बुध्द विहार | एकूण |
| 01 | दहागाव | 0.85 | 8.00 | — | — | 8.85 | 10.11 | 9.25 | 7.00 | 26.36 |
| 02 | कुंबळे | 3.75 | — | — | — | 14.60 | 29.00 | 30.00 | 10.00 | 69.00 |
| 03 | पिंपळगांव | 4.00 | — | — | — | 4.00 | 17.60 | 19.00 | — | 36.60 |
| 04 | कादवण | 5.40 | — | — | — | 5.40 | 10.00 | 11.30 | 2.00 | 23.30 |
| 05 | वलौते | 2.50 | — | — | — | 2.50 | 21.00 | 15.00 | 3.00 | 39.00 |
| 06 | भोळवली | 2.00 | — | — | — | 2.00 | 17.00 | — | — | 17.00 |
| 07 | म्हाप्रळ | 5.80 | 10.00 | — | — | 15.80 | 32.00 | 18.00 | 09.00 | 59.00 |
| 08 | शेनाळे | 1.80 | — | — | — | 1.80 | 3.00 | — | — | 3.00 |
| 09 | सडे | 3.50 | — | — | — | 3.50 | 7.00 | — | 5.00 | 12.00 |
| 10 | धुत्रोली | 1.60 | — | — | — | 1.60 | 11.50 | 9.00 | — | 20.50 |
| | **एकूण** | **31.20** | **23.00** | **5.85** | — | **60.05** | **158.21** | **111.55** | **36.00** | **305.76** |

वरील कोष्टकांचा विचार करता मंडणगड तालुक्यातील अभ्यास केलेल्या एकूण 10 गावांमध्ये शिक्षण संस्थांवर होणारा अंदाजित खर्च 60.05 लाख इतका असून धर्म व्यवस्थेतील प्रार्थना स्थळांवर होणारा खर्च 305.76 लाख इतका आहे. म्हणजेच शिक्षण व्यवस्थेवरील खर्चापेक्षा पाच पटीले खर्च हा धर्मव्यवस्थेवर झालेला दिसून येतो मात्र यातील शिक्षण व्यवस्थेवरील होणारा एकूण खर्चापैकी जवळपास 31.25 खर्च हा शासनाने केलेला दिसून येतो.

याचाच अर्थ वरील समाजामध्ये शिक्षण व्यवस्थेपेक्षा धर्मव्यवस्थेबद्दल मोठया प्रमाणात आस्था दिसून येते.

## धर्मानुसार प्रार्थनेला / उपासनेला दिलेला वेळ

| अ.क. | तपशिल | व्यक्ती | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | दिवसातून किमान अर्धा तास | 08 | 32 |
| 2 | दिवसातून किमान एक तास | 07 | 28 |
| 3 | दिवसातून किमान दोन तास | 08 | 32 |
| 4 | दिवसातून किमान 2 तासापेक्षा | 02 | 08 |
| 5 | वेळ देत नाहीत अधिक | — | — |
| | एकूण | 25 | 100 |

वरील कोष्टकानुसार धर्मातील 25 व्यक्तीपैकी सर्वच व्यक्ती किमान दिवसातून अर्धा तास व जास्तीत जास्त 2 तास तर काही व्यक्ती त्यापैक्षाही अधिक वेळ देतात असे दिसून येते. त्यामध्ये मुस्लिम समाजातील 5 वेळा नमाज, 1 महिना रोजा, हिंदु धर्मातील सकाळ संध्याकाळ होणारी प्रार्थना तर वर्षाकाठी होणारे सण उत्सव, तर बौध्द धर्मात होणारी पुजापाठ यानुसार प्रत्येक धर्मातील व्यक्ती ही धर्मासाठी वेळ देतांना दिसून येते असे त्याचे मत आहे.

## शिक्षण व्यवस्थेत दिलेल्या वेळेनुसार माहिती

| अ.क. | तपशिल | व्यक्ती | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 02 | 08 |
| 2 | नाही | 23 | 92 |
| | एकूण | 25 | 100 |

वरील एकूण 25 व्यक्तींपैकी 02 व्यक्ती हया शिक्षण व्यवस्थेला वेळ देतात. बाकी उर्वरीत 23 व्यक्ती हया वेळा देतांना दिसून येत नाहीत. वरील दोन व्यक्ती हया शालेय समितीच्या सदस्य असल्याचे त्यांना हा वेळ दयावा लागतो.

थोडक्यात शिक्षण व्यवस्थेकडे बघण्याचा समाजातील बऱ्याच व्यक्तींना वेळास असलेला दिसून येत नाही. किंबहुना तशी मानसिकताच दिसून येत नाही. शाहेच्या विकासामध्ये लोकांचा सहभाग असणे गरजेचे असते तोही दिसून येत नाही.

## संशोधकाचे मत

1) वरील सर्व संशोधन आकृतीबंधाचा विचार करता एकूण समाजामध्ये शिक्षण व्यवस्थेकडे बघण्याचा दृष्टीकोन फक्त साक्षर होणे किंवा पदवी घेणे असाच दिसून येतो. शिक्षण वयवस्थेला व्यवस्थेमध्ये शानाबरोबर समाजाचा सहभाग आवश्यक आहे. याची जाती व तेवढया प्रमाणात दिसून येतांना बघावयास मिळत नाही. आर्थिक सहभाग हा फारच कमी असलेला दिसून येतो.

2) मात्र या उलट धर्मव्यवस्थेमध्ये मात्र सर्वच व्यक्ती मोठया प्रमाणात वेळा व पैसा खर्च करतांना दिसून येतात. त्याबद्दल त्याच्यामध्ये कमालीची आस्था असलेली दिसून येते. नियमित उपासना व येणारा सण उत्सव याबाबत त्याच्यामध्ये कमालीची जागृतता उत्साह दिसून येतो. मात्र हाच उत्साह शिक्षणाबाबत दिसून येत नाही हेच नवल.